कार्यालयीन पत्र व्यवहार

# मुंबई जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक मर्यादित

**प्रधान कार्यालय** : "मुंबै बँक भवन", २०७, डॉ.डी.एन.रोड, फोर्ट, मुंबई - ४०० ००१.

---

## कार्यालयीन परिपत्रक

### अज्ञान बालक (Minor) च्या नावे उघडावयाच्या बचत खात्याचे धोरण

रिझर्व्ह बँकेच्या दि.२७/५/२०१४ चे परिपत्रक क्र.RPCD/CO/RRB.BC/NO-१०४/०३.०५.६६/२०१३-२०१४ नुसार १० वर्षावरील अज्ञान बालकास (Minor) त्याच्या नावाने खाते उघडण्यास परवानगी दिली असून बँकेच्या मा.संचालक सभा दि.२०/०६/२०१४ ठराव क्र.३ क नुसार Minor account Opening पॉलीसी मंजूर करण्यात आली आहे. त्या अनुषंगाने Minor व्यक्तीस खाते उघडताना घ्यावयाची कागदपत्रे व त्यास देण्यात येणाऱ्या सुविधा पुढील प्रमाणे आहेत.

**खाते उघडताना घ्यावयाची कागदपत्रे**

१) १० वर्ष पूर्ण असणाऱ्या Minor व्यक्तीस बँकेत खाते उघडता येईल.

२) मायनर व्यक्तीच्या नैसर्गिक पालक / कायदेशीर पालक (Natural guardian/Legal guardian) यांचे बँकेत खाते उघडून घ्यावे अथवा त्यांचे KYC घेण्यात यावे.

३) मायनरच्या जन्म तारखेच्या दाखल्याची सत्यप्रत त्यांच्या पालकांकडून प्रमाणीत करुन घ्यावी.

४) मायनर खातेदार व्यक्तीचा पासपोर्ट साइजचा फोटो घेण्यात यावा.

५) शाळेचे / कॉलेजच्या ओळखपत्राची सत्यप्रत पालकांकडून प्रमाणित करुन घ्यावी.

६) मायनर खातेदारांस कमीत कमी रु.१००/- भरुन खाते उघडता येईल. खाते उघडताना घ्यावयाची कागदपत्रे मुळप्रतीवरुन शाखाव्यवस्थापक / अधिकारी यांनी तपासून सही शिक्का करावयाची आहे.

७) मायनर खाते उघडण्याकरीता पालकांकडून Introduction घेण्यात येईल.

**मायनर खातेदारांस द्यावयाच्या सवलती**

१) मायनर खातेदारांच्या नावाने खाते उघडण्यात यावे.

२) खात्यावर व्यवहार करण्याचे अधिकार मायनर व्यक्तीस देण्यात यावे.

३) मायनर खात्याची वार्षीक व्यवहाराची मर्यादा रु.५०,०००/- पर्यंत राहील सदर मर्यादेचे उल्लंघन झाल्यास उपरोक्त खाते Freege करावे लागेल.

४) मायनर व्यक्तीस ATM Card देण्यात येईल परंतू एका वेळेस फक्त रु.२५००/- पर्यंतच रक्कम काढण्याची सुवीधा देण्यात येईल.

५) मायनर खातेदारांस आवश्यक असल्यास त्यांच्या पालकांच्या संमतीने चेकबुक देण्यात येईल.

६) मायनर व्यक्तीचे वय १८ वर्षे झाल्यानंतर त्यास इतर खातेदारास देण्यात येणाऱ्या सुविधा देण्यात येतील.

७) मायनर खातेदारांस Minimum Balance चार्जेस लावण्यात येणार नाहीत.

८) मायनर खातेदारास Account Maintenance चार्जेस लावण्यात येणार नाहीत.

९) मायनर खातेदारास TOD देण्यात देण्यात येणार नाही.

१०) मायनर खातेदारास SMS व E बँकीगची सेवा देण्यात येईल.